प्रकरण पाचवे

# उपसंहार

==================================================

## प्रकरण पाचवे

## उपसंहार

==================================================

बाळशास्त्री जांभेकरांनी मराठी भाषेतील 'दर्पण' पत्र प्रथमत:च सुरू केले तेंव्हा मराठी मुलखातच नव्हे तर संपूर्ण हिंदुस्थानमध्ये भौतिक जीवनाचा फारसा विचार झाला नव्हता.त्यावर परमार्थप्रवणतेची छाप होती. कृषीसंस्कृतीचा प्रभाव असल्यामुळे दैववाद मोठ्या प्रमाणावर रूजला होता. अज्ञान, रूढी-परंपरा, धर्मकल्पना,

अर्थजीवन,ग्रामव्यवस्था आणि सामाजिक व्यवहाराचे संकेत यावर दीर्घकालपर्यन्त मध्ययुगीन संस्कृतीचेच वर्चस्व राहिले. इंग्रजांच्या आगमनामुळे त्यांच्या विज्ञाननिष्ठ जीवनदृष्टीमुळे इहवादी, भौतिक जीवन विकासाची जाणीव निर्माण होऊ लागली. फ्रान्सच्या राज्यक्रांतीतून समता, स्वातंत्र्य, बंधुता ही लोकशाहीची मूल्येही हळूहळू आली. जीवनाच्या आर्थिक, धार्मिक, सामाजिक बाबतीत स्वतंत्रपणे विचार सुरू झाले. ब्रिटीशांचा व्यापार, राजकारण, धर्मप्रसार, शिक्षण यामुळे भौतिक उन्नती आणि मानसिक परिवर्तन घडून येऊ लागले. ब्रिटीश लोकांचे पुढारलेपण आणि आपले मागासलेपण लक्षात येऊ लागले. जीवन विकासाचे आणि सामाजिक उन्नतीचे महत्वाचे साधन म्हणजे शिक्षण आहे ही जाणीव बळावू लागली.

बाळशास्त्र्यांचा जन्मच शिक्षणाचा पिढीजात वारसा असलेल्या सुसंस्कृत घराण्यात झाल्यामुळे त्यांना शिक्षणाचे बाळकडू लहानपणापासूनच मिळू लागले. लहान वयातच इतिहास, भूगोल, ज्योतीष, गणित, विज्ञान या विषयामध्ये प्राविण्य संपादन केले. संस्कृत आणि इंग्रजीबरोबरच तेरा भाषा त्यांनी पारंगत केल्या. असामान्य धारणाशक्ती, व्यासंगी आणि बहुश्रुत व्यक्तिमत्व, प्रगल्भ बुध्दिमत्ता या गुणामुळेच एकापेक्षा अनेक पदे त्यांनी भूषविली. इंग्रज अधिकाऱ्यांच्या अंत:करणातील मानाचे स्थानही त्यांनी पटकविले. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी त्यांनी शैक्षणिक आणि सामाजिक बाबतीत केलेली कामगिरी अविस्मरणीय आहे. अध्यापक वर्गाची स्थापना, मुलांचे वसतीगृह, स्त्री शिक्षणाचा प्रयत्न, एतद्देशीयांना शिक्षणाभिमुख करण्यासाठी दिलेले उत्तेजन, सहकाऱ्यांना ग्रंथ लेखनास केलेली मदत, सरकारला शिक्षणकामी केलेले सहकार्य अशी अष्टपैलू कामगिरी बाळशास्त्र्यांनी बजावली. त्यांच्या ग्रंथरचनेकडे

दृष्टीक्षेप टाकल्यास त्यांच्या बुध्दिमत्तेची कल्पना तर येतेच शिवाय त्यांची लोकोपकारक जीवननिष्ठाही प्रत्ययाला येते.

बाळशास्त्र्यांच्या व्यक्तिमत्वाचे विशेष म्हणजे त्यांनी सनातनी आणि सुधारक, विद्वान आणि अज्ञानी, सरकार आणि जनता या सर्वांना बरोबर घेऊन सामाजिक सुधारणेचे जटील कार्य केले. ज्ञानप्रसारासाठी आणि `एतद्देशीयांना योग्यतेस आणण्यासाठी `दर्पण` या मराठी वृत्तपत्राची प्रथमत:च निर्मिती केली. `विद्या हे बळ आहे` असे सांगून आपले मागासलेपण आणि पाश्चात्यांचे पुढारलेपण लोकांच्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न केला. पाश्चात्य राष्ट्रात घडणा-या घडामोडी, बदलते लोकजीवन, विज्ञानात झालेली प्रगती यांची जाणीव करून दिली. सामाजिक वैगुण्यावर परखड विचार व्यक्त करून लोकांना शिक्षणाभिमुख करण्याचा महत्वाचा प्रयत्न केला. धर्माबाबतीत उदार आणि व्यापक विचार व्यक्त करून पाश्चात्य संकट हे राजकीय अथवा लष्करी उपायांनी उलटून टाकता येणार नाही तेव्हा पाश्चात्य संस्कृती तिच्या शास्त्रीय अंगोपांगासहीत आपण जाणून घेतली पाहिजे असे त्यांनी सांगितले. त्यासाठी नव्या गोष्टीचा अंगीकार करा आणि ब्रिटिशाप्रमाणे आपण आपल्या देशाला प्रगतीपथावर नेऊ शकू असा ठाम विश्वास जनतेमध्ये रुजविण्याचा प्रयत्न केला. बाळशास्त्री हे प्रबोधनाचे खंदे पुरस्कर्ते होते. समाजात अस्मिता,अस्मिता, स्वाभिमान आणि स्वदेश, स्वभाषा, स्वधर्म याविषयी प्रेम,आपुलकी निर्माण करण्याच्या दृष्टीने बाळशास्त्र्यांनी केलेले कार्य अजोड आहे. सुधारणावादी जीवनदृष्टी, आणि दूरदर्शीपणा लाभलेला प्रज्ञावंत सुधारक, विधायक बाण्याचा पत्रकार, मुरब्बी राजकीय विचारवंत, बहुश्रुत लेखक म्हणून त्यांचा यथार्थ गौरव केला जातो.

मराठी भाषेमध्ये `दर्पण` हे पहिलेच वृत्तपत्र असून सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिक बाबतीत `दर्पण` ने केलेले कार्य नि:संशय महान आहे. `दर्पण` मध्ये लोकांच्या मनोरंजनाबरोबरच ज्ञानदानाला महत्व दिलेले आहे. लोकांच्यामधील न्यूनगंड नाहीसा करुन आत्मविश्वास वाढविणे, त्यांना जागृत करणे, धर्म, रुढी, परंपरा घातक कशा आहेत हे सांगणे थोर व्यक्तिंचे विचार, आदर्श आणि कार्य जनतेसमोर मांडून लोकांना उद्युक्त करणे, वाचकांच्या पत्रांना स्थान देऊन त्यांना बोलके करणे, इंग्रजांच्या राज्यकारभारातील चुका दाखविणे, सुधारणांचे उपाय सुचविणे व सरकारकडून जास्तीत जास्त कार्याची अपेक्षा बाळगणे अशा सर्वांगीण बाबतीत `दर्पण` ने थोर कार्य केले. अपु-या सोई, अपुरा पैसा, बातमी मिळण्याची साधने अत्यल्प अशा संकटावर मात करुन वाचकांना कमी वर्गणीत अंक दिला. पत्राच्या पाठीमागे नफ्याचा कोणताही दृष्टीकोण न ठेवता आणि स्वत: मोबदला न घेता अगदी नि:स्वार्थीपणे `दर्पण` चे कार्य पार पाडले.

बाळशास्त्री जांभेकर हे महाराष्ट्रातील आद्य सुधारक म्हटले पाहिजेत. काळाच्या पुढे पहाण्याची त्यांची दृष्टी होती. त्यांनी अल्प आयु मर्यादेत सतत नव्या गोष्टींचा अंगिकार केला. जास्तीत जास्त लोकापर्यंन्त पोहोचण्यासाठी त्यांनी `दर्पण` ची निर्मिती केली. प्रथम पाक्षिक आणि नंतर साप्ताहिक असे त्याचे स्वरुप होते. `दर्पण` चा एकूण कालखंड जरी कमी असला तरी काळाच्या संदर्भात त्याचे सामाजिक कार्य मोलाचे आहे. शिक्षण, धर्मांतर, जातीयता, ब्रिटिश राज्यकारभार याविषयी लेखन केले आणि सत्यस्वरुप समाजाला दाखवून दिले. गुजराथी, पारशी, इंग्रजी वृत्तपत्रांच्या तुलनेत `दर्पण` चे

सामाजिक कार्य अधिक मोलाचे आहे. निर्भिडता, परखडपणा, प्रामाणिक मते, दूरदृष्टीपणा, लेखाभिमान, स्वदेश, स्वभाषा, स्वधर्म याविषयी लिखानातून दिसून येणारी आपुलकीची भावना या वैशिष्ट्यामुळेच ` दर्पण ` श्रेष्ठ ठरते.

` दर्पण ` कारांच्या ठिकाणी राष्ट्रीय विचारांची ठोस बैठक होती. हिंदुस्थानातील ` चले जाव ` चळवळीचे पुरस्कर्ते आणि द्रष्टे विचारवंत म्हणून त्याकडे पाहिले पाहिजे. त्याकाळात एवढया प्रगल्भ विचाराचा आणि कर्तृत्वाचा महान पुरुष महाराष्ट्राला लाभावा हे महाराष्ट्राचे भाग्य नव्हे काय ?

वाङ्.मयीन बाबतीत विचार केल्यास मराठी भाषेला सुघट आणि बांधेसुद बनविण्याचा प्रयत्न केला. विज्ञानातील संज्ञांना परिभाषा योजून नवीन शब्दांची भर घातली. इंग्रजी भाषेमधून आलेले निबंध, स्फूट प्रासंगिक लेखनाचे प्रकार मराठीत आणून निबंध आणि अग्रलेख व स्फूटलेखांची पायाभरणी केली. वृत्तपत्र कसे असावे याचा मराठी भाषिकांना धडा घालून दिला. ग्रंथांची परिक्षणे कशी करावीत, सडेतोड विचार कसे व्यक्त करावेत याचा पाठपुरावा एतद्देशीयांना घालून दिला. इंग्रजी, संस्कृत, फारशी, गुजराथी या सारख्या अन्य भाषेद्वारे मराठी भाषेचा विकास केला. एकंदरीत ` दर्पण ` चे सामाजिक, धार्मिक, राजकीय बाबीबरोबरच वाङ्.मयीन कार्यही नि:संशय महान आहे. ` दर्पण ` च्या रुपाने नियतकालिक वाङ्.मय हा वाङ्.मयाचा नवा प्रकार मराठीमध्ये रुढ केला. त्यानिमित्ताने भाषांतराचाही प्रयत्न सुरू झाला. इंग्रजी राज्याच्या आगमनाने महाराष्ट्रात जे स्थित्यंतर घडले त्याची एक महत्वाची सांस्कृतिक साक्ष म्हणजे ` दर्पण ` होय.

बाळशास्त्र्यांचे आदर्शभूत चारित्र्य, अथांग ज्ञानलालसा, स्वदेशोन्नतीची आत्यंतिक कळकळ, समाजोध्दाराची विशाल दृष्टी, असामान्य विद्वत्ता `दर्पण` चा अभ्यास करत असताना दिसून आल्यावाचून रहात नाही. बाळशास्त्र्यांसारखा विधायक बाण्याचा पत्रकार, विद्वान विचारवंत, स्वदेशोन्नतीची अत्यंत तळमळ असणारा संपादक लाभावा हेच `दर्पण` चे महत्वाचे वैशिष्ट्य. मराठीतील पहिले वृत्तपत्र असूनही आणि अत्यंत अल्पकाळ टीकूनही `दर्पण` ने सामाजिक आणि वाङ्मयीनदृष्ट्या मोलाचे कार्य केले यात वादच नाही.

...--o--..